## सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई

सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई येथे रोख कक्षातील कामकाजासाठी मंत्रालयीन सेवेतून निवृत्त झालेल्या एक कक्ष अधिकारी यांची एक वर्षाकरिता करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे. सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दिनांक १० जून, २०२५ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

अधिक माहिती विभागाच्या https://pwd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**(दत्तात्रय खारके)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

Details on Website

# सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई

## मंत्रालयीन सेवेतून निवृत्त झालेल्या कक्ष अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत

**विभागाची आवश्यकता :**

विभागातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांची आयकर विवरणपत्रे सादर करणे, वेतन पडताळणी पथकाने सेवापुस्तकामध्ये उपस्थित केलेल्या आक्षेपांची पूर्तता करणे इ. कामाचा अनुभव असलेल्या व मंत्रालयीन सेवेतून निवृत्त झालेल्या एक कक्ष अधिकारी यांची १ वर्षासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई येथे करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

**अटी व शर्ती :-**

१) सदर नियुक्ती प्रथमत: एक वर्षाकरिता सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि.१०.०६.२०२५ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

२) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे.

३) आयकर विवरणपत्रे सादर करणे, वेतन पडताळणी पथकाने सेवापुस्तकामध्ये उपस्थित केलेल्या आक्षेपांची पूर्तता करणे इ. कामाचा अनुभव आवश्यक.

४) उमेदवार मंत्रालयीन सेवेतून निवृत्त झालेला असावा.

५) उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

६) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.

७) आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या मंत्रालयीन सेवेतून निवृत्त झालेल्या इच्छुक सेवानिवृत्त कक्ष अधिकारी यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

८) उमेदवाराने त्यांचा अर्ज सदर पदाकरिता वेबसाईट वरील जाहीरात पाहून **doadmin२.pwd@maharashtra.gov.in** या ई-मेल आयडीवर दिनांक १५.०४.२०२६ पर्यंत सादर करावा. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

९) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

१०) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

११) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांना सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई येथे काम करावे लागेल.

१२) करार पध्दतीच्या नियुक्तीवरील कालावधीत सेवानिवृत्त कक्ष अधिकारी हे संबंधित सह सचिव/ उप सचिव यांच्या नियंत्रणाखाली काम करतील.

१३) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र.सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि.१०.०६.२०२५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहतील.

--x--

# अर्जाचा नमुना

## सेवानिवृत्त कक्ष अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज

उमेदवाराने अलीकडील काळातील स्वतःचे छायाचित्र येथे चिकटवावे

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव :-.........................................................................

२) अर्जदाराचा पत्ता :-.........................................................................

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :-.........................................................................

४) भ्रमणध्वनी क्रमांक :-.........................................................................

५) जन्म दिनांक व वय :-.........................................................................

६) मूळ निवृत्तिवेतन :-.........................................................................

(PPO ची प्रत सोबत जोडावी)

७) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय? :- होय/नाही

८) अनुभव :-.........................................................................

९) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संकेतस्थळावर दि. रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीरातीच्या अनुषंगाने या पदासाठी मी काम करण्यास इच्छुक असून जाहीरातीतील /सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

**ठिकाण :-**

**दिनांक :-**

**अर्जदाराची स्वाक्षरी**